# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनीक्र./फॅक्सक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gug.registrar@gmail.com

जा.क्र. /गों.वि.ग/कु.स.का./२२०४/२०२४ दि.०४/०३/२०२४

## परीपत्रक

**विषय :- " संविधान सन्मान महोत्सव " साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ :- दि. ९ व २० नोव्हेंबर, २०२३ च्या अधिसभेतील बाब क्र.१६ मधील ९ डॉ. मिलींद भगत यांचा प्रस्ताव.**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व संस्था / महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, भारतीय राज्यघटनेची उद्देशिका ही संविधानाची मुलभूत तत्वे आणि उद्दीष्टे सांगणारे प्रास्ताविक विधान आहे. भारतीय संविधान २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी संविधान सभेने स्विकारले आणि २६ जानेवारी, १९५० रोजी अंमलात आणले. भारतीय संविधान लागु झाले याला २६ नोव्हेंबर, २०२३ रोजी ७४ वर्षे पुर्ण होऊन ७५ व्या वर्षांत म्हणजेच " अमृत महोत्सवी " वर्षात पदार्पण होत असल्यामुळे संदर्भिय अधिसभेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंन्द्रामार्फत भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने संविधान सन्मान महोत्सवाचे वर्षभरात आयोजन करण्यात यावे, तसेच महाविद्यालयांमध्ये राष्ट्रगीतानंतर संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यासाठी महाविद्यालयांना निर्देशीत करण्यात यावे असा ठराव पारित करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने संलग्नित महाविद्यालयामध्ये माहे मार्च, २०२४ पासुन ते २६ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत संविधान जागृती व नितिमत्ता निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन **" संविधान सन्मान महोत्सव"** राबविण्यात यावा व महाविद्यालयांमध्ये राष्ट्रगीतानंतर संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात यावे व केलेल्या उपक्रमांचा अहवाल विद्यापीठात सादर करावा.

**(डॉ. अनिल हिरेखण)**
**कुलसचिव**

**प्रतिलिपी माहितीकरीता सादर:-**

१) मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२) मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३) सर्व विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) सिस्टीम ॲनलिस्ट, संगणक विभाग सदरहु परिपत्रक संकेत स्थळावर प्रकाशित करण्यात यावे.